# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./2923 /२०२६ दि. 28 /०६/२०२६

## परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र भुषण पुरस्कार- 2025 – करीता प्रस्ताव सादर करण्याबाबत**

संदर्भ - महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. 1934/31, दि. 15/06/2026.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र भुषण पुरस्कार हा राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान आहे. हा पुरस्कार कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणाऱ्या व्यक्तीला प्रदान करण्यात येतो. सदर पुरस्कारासाठी गोंडवाना विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पात्र व्यक्तींची शिफारस (वैयक्तिक माहितीसह) विहीत कालावधीत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचेकडे करावयाची आहे.

त्याअनुषंगाने सदर पुरस्कारासाठी गोंडवाना विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पात्र व्यक्तींनी खालील तक्त्यात आपली माहिती भरुन, तसेच बायोडेटा व आवश्यक दस्तऐवजांसह आपला प्रस्ताव दि. 01/07/2026 पर्यंत कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, पत्ता – एम. आय. डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स एरिया, गडचिरोली यांचेकडे पोहचतील, या बेताने पाठविण्यात यावे.

| अ.क्र. | प्रस्ताव सादर करणाऱ्या मान्यवराचे नाव | जन्मदिनांक व वय | कार्यक्षेत्र | कधीपासून या क्षेत्रात कार्यरत आहेत | विशेष कार्य | मिळालेला पुरस्कार / सन्मान (असल्यास) | महाराष्ट्रात किमान 15 वर्ष वास्तव्य आहे का? (अधिकृत पुरावा जोडावा) | पद्म पुरस्कार प्राप्त मान्यवर (प्राधान्य) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

सदर पुरस्काराबाबतची माहिती यासोबत जोडलेली आहे.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये,

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर:**

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४. सर्व प्रशासकिय/शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख / समन्वयक/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
५. STRC, UIT, आदर्श पदवी महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
६. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
७. सहा. कुलसचिव / उपकुलसचिव, महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांना अवगत करुन द्यावे.
८. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# महाराष्ट्र भूषण पुरस्कार योजनेचे नियम, अटी व शर्ती

( पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शा.नि.क्र.मभूपु २०१२/सुनिठ/प्र.क्र.१४३/सां.का.४, दि. १ सप्टेंबर, २०१२ चे परिशिष्ट )

उद्दिष्ट :- महाराष्ट्र राज्यात कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणाऱ्या तसेच त्याद्वारे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस "महाराष्ट्र भूषण" हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मानित करणे.

**पुरस्कारासाठी पात्रता व निकष :-**

१. संबंधित व्यक्तीने त्याच्या क्षेत्रात किमान २० वर्षे सातत्याने सेवाभावी वृत्तीने तसेच वैशिष्टयपूर्ण/ उल्लेखनीय कार्य केलेले असावे. मात्र संशोधनाद्वारे कोणत्याही क्षेत्रात नवीन शोध लावला असल्यास तसेच क्रिडा क्षेत्रात अव्वल दर्जाचे अनेक पुरस्कार प्राप्त खेळाडूच्या बाबतीत विचार करुन हा नियम शिथिल करण्यात येईल.

२. सदर व्यक्तीचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.

३. पद्मपुरस्कार प्राप्त मान्यवरांना सदर पुरस्कारासाठी प्राधान्य देण्यात येईल.

**पुरस्काराचे स्वरुप :-**

१. या पुरस्काराची रक्कम रु. २५ लाख .

२. पुरस्कारर्थीला शाल,सन्माचिन्ह, मानपत्र.

# महाराष्ट्र भूषण पुरस्कार

## यापूर्वी खालील मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे

| अ.क्र. | पुरस्कारार्थीचे नाव | क्षेत्र | वर्ष |
|---|---|---|---|
| १. | पु.ल.देशपांडे | साहित्य | १९९७ |
| २. | श्रीमती लता मंगेशकर | संगीत | १९९८ |
| ३. | श्री सुनील गावसकर | क्रीडा | १९९९ |
| ४. | डॉ.विजय भटकर | विज्ञान | २००० |
| ५. | श्री सचिन तेंडूलकर | क्रीडा | २००१ |
| ६. | पं.भीमसेन जोशी | कला/संगीत | २००२ |
| ७. | डॉ.अभय बंग व राणी बंग | समाज प्रबोधन | २००३ |
| ८. | श्री बाबा आमटे | समाज प्रबोधन | २००४ |
| ९. | डॉ.रघुनाथ माशेलकर | विज्ञान | २००५ |
| १०. | श्री रतन टाटा | उद्योग | २००६ |
| ११. | श्री रा.कृ.पाटील | समाजप्रबोधन | २००७ |
| १२. | श्री मंगेश पाडगावकर | साहित्य | २००८ |
| १३. | श्री नानासाहेब धर्माधिकारी | समाज प्रबोधन | २००९ |
| १४. | श्रीमती सुलोचना लाटकर | मराठी चित्रपट | २०१० |
| १५. | श्री जयंत नारळीकर | विज्ञान | २०११ |
| १६. | श्री अनिल काकोडकर | विज्ञान | २०१२ |
| १७. | श्री बाबासाहेब पुरंदरे | साहित्य | २०१५ |
| १८. | श्रीमती आशा भोसले | संगीत | २०२१ |
| १९. | डॉ.श्री.दत्तात्रेय नारायण उर्फ आप्पासाहेब धर्माधिकारी | समाज प्रबोधन | २०२२ |
| २०. | श्री.अशोक सराफ | मराठी चित्रपट | २०२३ |
| २१. | श्री.राम सुतार | दृश्यकला | २०२४ |